# पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
## जनसंपर्क शाखा

P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com


# वार्तापत्र

दिनांक २६/०९/२०१९

| **पो.स्टेशन/अप.क्र./कलम** | **घटनास्थळ/घटना ता.वेळ** | **फिर्यादी व आरोपीतांचे नाव** |
|---|---|---|
| धानोरा | मौजा पिसेवडधा १८ किमी उत्तर<br>**घटना ता. वेळ :-** दिनांक २६.०९.२०१९ चे ०६.०० वाजता | सरकार तर्फे :- पोउपनि. भागवत कदम नेम. स्थानिक गुन्हे शाखा पोलीस अधिक्षक कार्या. गडचिरोली<br>आरोपी चे नाव :- नानेश्वर सुखदेव आदे वय ३२ वर्षे, रा. पिसेवडधा ता. धानोरा जिल्हा गडचिरोली |
| **माहिती कशी प्राप्त झाली** | **सुगंधीत तंबाखु रेड मधील सक्रिय अधिकारी/कर्मचारी** | |
| गोपनिय बातमीदारा कडुन मिळालेल्या माहिती वरुन | पोउपनि भागवत कदम सफौ/ दादाजी करकाडे, पोहवा/ कान्हु गुरनुले, पोशि/नुतेश धुर्वे, चापोहवा/मानीक निसार, स्थानिक गुन्हे शाखा, पोलीस अधिक्षक, कार्या. गडचिरोली | |

महाराष्ट्र शासनाने गडचिरोली जिल्ह्यात सुगंधीत तंबाखु विक्रीस आणि बाळगण्यास बंदी घातली असल्याने अवैध सुगंधीत तंबाखु, अवैध दारु विक्रेत्यांवर अंकुश बसावा याकरीता मा. श्री. शैलेश बलकवडे, पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांनी गडचिरोली जिल्हयातील अवैध सुगंधीत तंबाखु, अवैध दारु, जुगार व इतर अवैध व्यवयांवर रेड करुन प्रभावीपणे कायदेशिर कारवाई करण्याची जबाबदारी स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आलेली जबाबदारी पार पाडत असतांना दिनांक २६.०९.२०१९ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस पथक पोलीस स्टेशन आरमोरी, धानोरा अंतर्गत अवैध दारु रेड सबंधात गस्त करीत असतांना गोपनिय सुत्रांकडुन माहिती मिळाली की, मौजा पिसेवडधा येथील ठोक सुगंधीत तंबाखु विक्रेता नानेश्वर सुखदेव आदे वय ३२ वर्षे, रा. पिसेवडधा ता. धानोरा जिल्हा गडचिरोली हा अवैध सुगंधीत तंबाखुचा साठा करुन तो चिल्लर सुगंधीत तंबाखु विक्रेत्यांना तात्काळ पुरवठा करणार आहे. अशा मिळालेल्या माहितीचे आधारे मा. श्री. डॉ. मोहित कुमार गर्ग, अपर पोलीस अधिक्षक (प्रशासन) तसेच पोलीस निरीक्षक उल्हास भुसारी यांना माहिती सांगुन त्यांचे आदेशाने व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेमधील नमुद पोलीस पथक स्थानिक पंचासह मौजा पिसेवडधा येथे पोहचुन मिळालेल्या माहितीची शाहानिशा करीत असतांना अवैध ठोक सुगंधीत तंबाखु विक्रेता नानेश्वर सुखदेव आदे वय ३२ वर्षे, रा. पिसेवडधा ता. धानोरा जिल्हा गडचिरोली हा साठणुक केलेला सुगंधीत तंबाखु चिल्लर सुगंधीत तंबाखु विक्रेत्यांना पुरवठा करण्याचे तयारीत असतांना त्याचे ताब्यात एकुन ९७,३१०/- **रुपयाचा सुगंधीत तंबाखुचा साठा** मिळुन आल्याने सदर बाबत कायदेशीर कारवाई करणे करीता अन्न व औषध प्रशासन अधिकारी, गडचिरोली यांना माहिती सांगुन मिळालेला माल आणि नानेश्वर सुखदेव आदे वय ३२ वर्षे, रा. पिसेवडधा ता. धानोरा जिल्हा गडचिरोली यास ताब्यात घेवुन नमुद ईसमा विरुध्द कायदेशीर कारवाई करण्याकरीता पोलीस स्टेशन धानोरा यांचे स्वाधिन केले. स्थानिक गुन्हे शाखेच्या कारवाई मुळे अवैध सुगंधीत तंबाखु आणि अवैध दारु विक्रेत्यांचे धाबे दणानले आहेत.


लाभ